Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

VOL- IX | ISSUE- VIII | AUGUST | 2022 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.331 | ISSN 2349-638x

# सर्व प्रवाहांना आपल्या कवेत घेणारी मराठी कविता

**प्राचार्य डॉ. पांडुरंग निवृत्ती गायकवाड**
प्राचार्य, महात्मा फुले कॉलेज,
पिंपरी, पुणे
ई-मेल – gaikwadpn@gmail.com

**प्रस्तावना :**

मराठी वाड्मयप्रकारामध्ये कविता हा वाङःमयप्रकार आदिम आहे. या वाङःमयप्रकाराचे स्वरुप विविध कालखंडात बदलत गेलेले दिसते. प्राचीन, मध्ययुगीन, अर्वाचीन कालखंडातील कवितेने विविध वळणे घेतली आहेत. यास्तव कवितेच्या स्वरुपाचा आणि वाटचालीचा आढावा तेवढाच वैशिष्टयपूर्ण असल्याचे दिसते.

**कवितेचे विविध प्रकार :**

मराठी साहित्य लेखनामध्ये गद्य आणि पद्य असा फरक केला जातो. पद्य हा भाषा प्रकार आदिगीतातून निर्माण झाला आहे. गीताची रचना नाद, ताल, लय या घटकांच्या साहाय्याने केली जाते. “छंद, वृत्त, जाती यांचे नियम पाळून केलेली रचना म्हणजे पदय होय. छंद, वृत्त, जाती यांचे नियम न पाळताही पद्यरचना केली जाते. अशा रचनेत लयीचे बंधन पाळले जाते, अशा रचनाप्रकाराला मुक्तछंद वा मुक्तशैलीतील पद्य म्हटले जाते.”[१] या वाटेवर कवितेचे अनेक प्रकार पाहण्यास मिळतात.

संत, पंत, तंत या नामवैशिष्ट्याने मध्ययुगीन कवितेचा अभ्यास केला जातो. त्यामध्ये ओवी, अभंग, पद, आरती, स्तोत्र, भूपाळी, विरहिणी, गौळण, भारुड, श्लोक, आख्यानकाव्य, लावणी, कटाव, फटका, पोवाडा, झगडा इ. मध्ययुगीन काव्यप्रकार आहेत. आधुनिक काव्य प्रकारामध्ये गझल, मुक्तछंद, दशपदी, हायकू, विडंबन असे विविध प्रकार मानले जातात. भावकविता, कथाकविता, नाट्यकविता व भाष्यकविता असे काही ठळक काव्यप्रकार मानता येतात.या प्रकारांचे पुन्हा काही उपप्रकार पडतात. ते खलीलप्रमाणे-

**भावकविता :**

ओवी,अभंग,गीत,पद,आरती,धावा,धवळे,विराणी,स्तोत्र,पाळणा,भूपाळी,लावणी,सुनीत,गझल,हायकू,रुबाई इ.

**कथाकविता :**

आख्यानकविता,कटाव,पोवाडा,खंडाकाव्य,स्वयंवरकाव्य, महाकाव्य,कथनपर दीर्घकविता इ.

**नाटयकविता :** भारूडे,रूपके,पोवाडे इ.

अशा प्रकारे भावकविता, कथाकविता, भाष्यकविता,नाट्यकविता यांचे वर्गीकरण करता येईल.

**कवितेचे स्वरूप :**

साधारणपणे नाद, लय, ताल, यांना महत्त्व देऊन ज्या रचना साकार झालेल्या असतील त्यांना कविता म्हटले जाते. सर्व भाषेमध्ये कवितेला प्रदीर्घ व अखंड परंपरा आहे. आईच्या मुखातून ऐकलेले गाणे हा माणसाच्या जीवनातील पहिल्या आविष्काराचा प्रत्यय होय. परंतु गाणे म्हणजे कविता नव्हे.

मानवाने स्वतःच्या भावना व्यक्त करण्याच्या जाणिवेतून शब्द, भाषेचा शोध लावला भाषेची निर्मिती माणसाच्या विचार व्यक्त करण्याच्या प्रेरणेतून झालेली नाही तर मूलतः मानवी भावना व विकार आविष्कृत करण्याच्या प्रेरणेतून भाषेची निर्मिती झाली आहे. एखादा कवी जेव्हा आपला अनुभव व्यक्त करण्याचे उदिष्ट डोळयापुढे ठेवतो तेव्हा त्या अनुभवाला अनुरुप असा रचना प्रकार निवडतो. केवळ रचना प्रकारालाच प्राधान्य देण्यामुळे कविता निर्माण होत नाही. वसंत आबाजी डहाके म्हणतात, “नादवर्ती, अर्थवती, ध्वनिवर्ती शब्दरचना म्हणजे कविता”[२] कवितेमध्ये वर्ण,अक्षर,पद,शब्द,वाक्य,ओळ, परिच्छेद यांच्या मांडणीला, क्रमाला आणि अर्थपूर्णतेला महत्त्व असते. त्याचप्रमाणे वर्णाचा नाद शब्दांचा वाच्यार्थ आणि व्यंग्यार्थ हे घटही महत्त्वाचे असतात. कवितेची

निमिर्तीही त्या त्या अनुभवाचं नि दृष्टीचं रूप असते. कवी नामदेव ढसाळ कवितेचं अस्तिव सांगताना लिहितात,

**प्रकाश आणि स्वातंत्र्य ही आहे जगाची शक्ती**
**आणि कविता आहे जगाचं हृदय**
**ती जाणिवेला सखोलता देतेती भावनेला व्यापकता देते**
**ती रक्तातून उमलेल्या संवेदनाकुलावर मोहित होते.**
**ती पूर्वजांच्या चुकांचा, कर्तृत्वाचा, वैगुण्याचा**
**-हासाचा, विजयाचा, छळाचा इतिहास अधोरेखित**
**करते."**[३]

कविता ही अशी अनेक भावनांचे नि दिशाचं चित्र रेखाटते.

कविता हा प्रकार इतर वाड्मयप्रकारांपेक्षा वेगळा आहे. कवितेमध्ये अनेक प्रतिमा, प्रतीके, अलंकार यांचा वापर असतो. कवितेमध्ये कवीचा सूर ऐकू येतो. त्याची जीवनदृष्टी कळते. वाड्मयप्रकारांपेक्षा या पुस्तकात लयबध्दता, सूचकत्व, अनेकार्यक्षमता, अल्पाक्षरत्व, व्यापक जीवनाशयक्षमता, काळातील वर्तमानता, सेंद्रिय एकात्मता, संवधता इ. कवितेच्या घटकाची चर्चा केली आहे. त्याच प्रमाणे काही भारतीय व पाश्चात्य अभ्यासकांनी कवितेच्या व्याख्या केल्या आहेत. परंतु कवितेची एकच एक परिपूर्ण अशी व्याख्या करणे अवघड आहे.

कवी आपल्या संवेदनातून काव्य निर्माण करता असतो. ती त्याची सहजस्फूर्त प्रतिक्रिया असते. कवितेने अनुभवाचा साक्षात प्रत्यय दयावा ही रसिकांची इच्छा असते. कवितेतील अंतर्मुखता, आत्मनिष्ठा ही वाचकांच्या अंतरंगात उतरते. अशी सहसंवेदना शब्दनिर्मिती म्हणजे कविता असे म्हणता येईल. कवितेमध्ये विविध भावरसांचा अंतर्भाव झालेला असतो. गो.ग.आगरकर यांनी १८८६मध्ये केसरीच्या ४६ व ४९ व्या अंकात कवी, काव्य, काव्यरती याविषयी महत्वपूर्ण लेख लिहिला. यात कविताविषयक अभिप्राय मांडताना ते म्हणतात, "जी रचना वाचकांच्या अंत:करणात अनुकूल संवेदना उत्पन्न करण्या करिता केलेली असते ती काव्य होय."[४] काव्य करणारा तो कवी असा अर्थ आता रुढ झाल आहे. त्या पासून काव्य, कवन, कविता, कवित्व असे शब्द सिध्द झालेले आहेत. हे मराठी व्युत्पती कोशात सांगितले आहे.

अवतीभोवतीच्या जगातून कवीची भावसंवेदना जागृत होते. या भावसंवेदनाचे उत्कृट आविष्कारी शब्दरुप म्हणजे कविता असते. कवितेला कोणी आकाशातील वीजम्हणतो कोणी प्रेयसी, तर कोणी प्रतिभाशक्ती म्हणतो. कविची वृत्ती ही कवितेची शैलीठरवते व त्यातूनच कवितेचा विविधांगी प्रत्यय येतो.

### मराठी कवितेची वाटचाल :

आद्य कवीचा मान मुकंदराज यांना दिला जातो. मध्ययुगीन कालखंडातल्या वाड्मयनिर्मितीची मुख्य प्रेरणा आध्यात्मिक स्वरुपाची होती. महानुभव, वारकरी इ. सांप्रदायिकांनी केलेली वाड्मयनिर्मिती महत्त्वाची ठरली. संताची 'अभंगवाणी' अभंग ठरली. ज्ञान, भक्ती आणि मोक्ष त्यांच्या कवितेतून प्रकट झाली. महानुभावांचे 'सात'ही ग्रंथ भक्ती आणि पांडित्याचा उत्तम समन्वय आहे. 'ज्ञानेश्वरी' हा काव्यग्रंथ तर मराठीचं 'अमृतलेणं' आहे. ज्ञानेश्वरांची महती सांगताना अच्युतराव कोल्हटकर लिहितात, "ज्ञानेश्वरादिपैकी कोणताही कवी घ्या. ज्या दृष्टीने कवी काव्ये रचतात तशी दृष्टी एकाही कवीची नव्हती, काव्ये रचण्यापेक्षा या सर्व महापुरुषांचा फारच उदात्त उद्देश होता. त्यांना कालिदास म्हणवून घेण्याची मुळीच हाव नव्हती. त्यांची मुख्य तृष्णा परमेश्वराने आपणास आपले दास म्हणावे एवढीच होती. अशा थोर विभूतींना कवी म्हणणे ही एक प्रकारे त्यांची योग्यता कमी करण्यासारखे आहे."[५]

१३ व्या शतकाच्या अगोदर महाराष्ट्रात संस्कृत प्राकृत अपभ्रंश भाषेत वाड:मय निर्माण झाले. १२ व्या शतकात तेलगु काव्यात मराठी पदे आढळतात. संत कवितेमध्ये भक्ती, पंत कवितेमध्ये पांडित्य, तंत कवितेमध्ये पोवाडे आणि लावणी यांचा समावेश होतो. संत कवितेमध्ये सावतामाळी, संत गोराकुंभार (१२६७-१३१७), सेना न्हावी, नरहरी सोनार, चोखामेळा, जनाबाई, सोयराबाई, मुक्ताबाई, कान्होपात्रा, एकनाथ, संत तुकाराम इ. संत मेळयाने आपल्या अभांगातून तत्वचिंतन मांडले आले. त्याचप्रमाणे पंत कवितेमध्ये सामराज (इ.स. १६०८-१६८८), विठ्ठल बीडकर आनंदतनय, रघुनाथ पंडित इ. चे साहित्य मराठी काव्यात महत्त्वाचे ठरले. तंत काव्यामध्ये होनाजी बाळा, रामजोशी, अनंत फंदी, परशराम, सगनभाऊ इ.

शाहिरांनी मध्ययुगीन कवितेला पोवाडे लावणीचे वैभव दिले.

**मराठी अर्वाचीन कविता :**

१८०० ते १८७४ या अव्वल इंग्रजी कालखंडातील कविता ही संक्रमण अवस्थेतील होती. नवशिक्षितांनी भिन्न भिन्न काव्यप्रकार मराठीत आणले. कोल्हटकर, म. मो. कुंटे, म. फुले, विष्णुशास्त्री पंडित, विष्णुबुवा ब्रह्मचारी इ. नी लोककवितेची बीजे रुजविली. १८८५ ते १९२० या कालखंडात केशवसुतांच्या कवितेने मराठी कवितेला लौकिक मिळवून दिला. म्हणून 'युगप्रवर्तक कवी' असा त्यांना मान दिला जातो. कवितेचा मोहरा अलैकिकाडून लौकिकाकडे वळला. त्यानंतर रे. ना. वा. टिळक (१८६१-१९१९), माधवानुज (१८७२-१९१६), कवी दत्त (१८७५-१८९९), गोविंदाग्रज (१८८५-१९१९), बालकवी (१८९०-१९१८), रेंदाळकर (१८८७-१९२०), कवी बी (१८७२ १९४७) इ. कवींनी अर्वाचीन कवितेला समृध्द बनविले. कवी विनायक यांनी कवितेत बोधवाद महत्वाचा मानला. कवी गोविंद हे शरीराने पांगळे होते पण त्यांचे मन वज्रासारखे होते. 'सुंदर मी होणार' हे करुणोदात्त काव्य लिहिले. सावरकरांनी (१८८३ ते १९६६) आपल्या कवितेतून राष्ट्राचे चैतन्य जागविले. त्यांच्या 'सागरास' सारख्या भावनोत्कट कवितेने भारतीयांच्या मनाची पकड घेतली. सफल, निर्मल उज्जल, उदात्त पत्नीप्रेमाची कविता हे तांबे यांच्या कवितेचे महत्त्वाचे वैशिष्टये आहे.

१९२३ मध्ये पुण्यात रविकिरण मंडळाची स्थापना झाली माधव ज्युलियन (१८९५ ते१९३९ ) हे रविकिरण मंडळातील प्रमुख कवी होते. त्यांनी कवितेला प्रेमरसाची देणगी दिली. 'विरहतरंग' सारखे त्यांचे खंडकाव्य विशेष फुलले. कवी यशवंत, कवी गिरीश यांनी याच वाटेवरुन कविता पुढे नेली. केशवकुमारानी 'झेडुची फुले' लिहून मराठी कवितेला विडंबन कवितेची प्रभावी देणगी दिली. कवी अनिल यांनी कवितेला समाजाभिमुख बनविले. 'भग्नमूर्ती' या खंडकाव्याद्वारे त्यांनी राष्ट्रीय जाणीव प्रकट केली. 'पेर्ते व्हा' चा संदेश देऊन प्रेम आणि जीवन समोर ठेवले सहृदयी मानवतावाद त्यांनी जोपासला. कुसुमाग्रज हे वास्तवादी आणि मानवतावादी कवी म्हणून लोकप्रिय झाले. बा. भ. बोरकर यांनी गोव्यातील निसर्गाचे भावरम्य चित्र रेखाटलं. वा. रा. कांत यांच्या कवितेत उग्रता व दाहकता प्रत्ययास येतो. बा. सी. मर्ढेकरांची कविता मानव्याची विटंबना मांडते. मर्ढेकरांना नवकाव्याचे जनक मानले जाते. नवकाव्याचे वेगळेपण त्यांनी सांगितले. मंगेश पाडगावकर, वसंत बापट यांच्या कवितेने जीवन दिशा सांगितली. स्त्री मनाची स्पंदने सशक्त करणा-या कवयित्रींमध्ये बहिणाबाई चौधरी, संजीवनी मराठे, इंदिरा संत, शांता शेळके, पद्मा गोळे इ. चा समावेश होतो. यही पुढे जाऊन १९६० नंतर आधुनिक नाव कवितेत विविध प्रवाह निर्माण झाले आणि ते काळाच्या प्रवाहबरोबर विकसिठी झाले त्यांनी स्वत:चे वेगळे असे अस्तित्व निर्माण केले. त्यांचा थोडक्यात आढावा येथे घेता येईल.

**मराठी दलित कविता :**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाला प्रेरणेचे पंख दिले त्यांनी 'मूकनायक' जागा केला. त्यातूनच दलित कविता जन्माला आली. १९६० नंतर या कवितेने आपले विद्रोही स्वरुप प्रकट केले. केशव मेश्राम यांनी विद्रोही कवितेचे संपादन केले. सगळ्या गावात दिवे लावणा-या आपल्या बापाला शरणकुमार लिंबाळे म्हणतात,

'बा, तू ज्या वाटेकर दिवे लावलेस
पण त्यांनी तुझी वाट
अंधारीच ठेवली रे " (येलू)

दलितांनी आपल्या जगण्याभोगण्याचे चित्र कवितेत रेखाटलं आहे. दलित कवितेबद्दल गो.म.कुलकर्णी म्हणतात, "दलित कविता हे दलित भावभावना, कल्पना, विचार, संकल्प, स्वप्ने, सत्ये, यांचे एक मोहोळच बनले आहे. स्फोटक स्वरुपाचा आशय सहजपणे आविष्कृत करण्याच्या दृष्टीने कवितेचे माध्यम उपयुक्त ठरत नसल्यामुळे दलित साहित्यात कवितेचे संख्याधिक्य आढळते. या कवितांतून प्रगट होणा-या आशयाचे मध्यवर्ती स्वरुप प्रामुख्याने केवळ विद्रोहाचे आणि संघर्षाचे आहे."[६] अंगार, ठिणगी, सुरुंग, कोंडवाडा, मरण स्वस्त होत आहे, रक्ताळलेली लक्तरे, उद्रेक, मरणकळा, विटाळ ही शीर्षके पाहता दलित कवितेमध्ये समाजप्रबोधनच्या नव्या जाणिवा आहेत. त्यामुळे दलित कविता मराठीत कवितेत वेगळी ठरली.

**मराठी ग्रामीण कविता :**

दलित कवितेप्रमाणे ग्रामीण कवितेने आपले वेगळेपण सिध्द केले आहे. दलित कविता विद्रोहातून जन्माला आली. तर ग्रामीण कविता कृषी व बहुजन समाजाच्या शोषण व्यवस्थेतून जन्माला आली. शेती, निसर्ग, माणूस, संस्कृती यांच्या भोवतीचं भावसंवदेन ग्रामीण कवितेत व्यक्त झाले आहे.

म. गांधींच्या 'खेडयाकडे चला' या संदेशामुळे कवी, लेखकांना ग्रामीण समाजाचे आकर्षण वाढले. परंतु त्याही अगोदर म. फुले यांनी 'शेतक-याचा आसूड' ग्रंथातून शेती व शेतक-याचे दाहक वास्तव मांडले. १९ व्या शतकाच्या उतरार्धातच ग्रामीण जीवनाची दाहकता साहित्यात प्रतिबिंबित झाली. याबद्दल विश्वास जहागिरदार म्हणतात, "ग्रामीण कवितेमध्ये बाहयवास्तव हे खेडे, निसर्ग आणि पारंपरिकमूल्ये यातून घडलेले ग्रामजीवन आहे आणि त्यात आकाररुपाला आलेली संवेदनशीलता त्या जीवनातील अनुभवाविषयीच्या प्रतिक्रिया देत असते. अशा कवितेच्या निर्मितीच्या बुडाशी असलेली संवदेनशीलता ही ग्रामीण संवेदनशीलता आहे आणि अशी कविता ग्रामीण आहे, असे स्थूलमानाने म्हणता येईल."[७]

रविकिरण मंडळातील गिरीश, यशवंत यांनी ग्रामीण कवितेकडे लक्ष वेधले. गिरीशांची 'भलरी', 'आमराई' तर यशवंताची 'प्रेमाची दौलत,' 'न्याहरीचे गाणे' इ. कवितामधून ग्रामीण जिवणाचे चित्रण आले आहे. भा.रा. तांबे यांच्या 'गुराख्याचे गाणे,' 'दृष्काळानंतर सुकाळ' या जानपद कवितेतून ग्रामीण जीवन आविष्कृत झाले, ना.घ.देशपांडे, अनंत काणेकर, सोपानदेव चौधरी, ग.ह.पाटील, ग.ल.ठोकळ इ. कवींच्या कवितामधून ग्रामीण जीवनाचे दर्शन घडते. बहिणाबाई चौधरी यांच्या 'बहिणाबाईची गाणी'(१९५२) मधून वास्तवस्पर्शी ग्रामीण जीवन मराठीत आले.

'धरतीचया कुशीमधी बियावियानं निजली
वऱ्हे पसरली माटी
जशी शाल पांघरली'

बहिणाबाईंच्या कवितेबद्दल आचार्य अत्रे म्हणतात, 'बहिणाबाईची कविता जुन्यात चमकेल आणि नव्यात झळकेल अशी आहे.' आनंद यादव यांचा 'हिरवे जग,' 'मायलेकर,, 'मळयाची माती,' त्याचप्रमाणे ना.धों. महानोर यांच्या 'रानातल्या कविता' (१९६७), राजन गवस यांचा 'हुंदका' (१९८३), श्रीरंग विष्णू जोशी यांचा 'आईची कविता' (१९८५) इ. मधून ग्रामीण जीवनाचे दर्शन घडते. त्याचप्रमाणे विठ्ठल वाघ, केशव मेश्राम, मोहन पाटील, सोपान हाळमकर, सुधाकर गायधनी, माधव थोरात, वामन निंबाळकर, दामोदर मोरे, टी.एन. परदेशी, चंद्रकुमार नलगे, प्रतिमा इंगोले, इंद्रजित भालेराव, कैलास सार्वेकर अशा अनेक कवींनी ग्रामीण कवितेला समृध्द केले आहे आणि आजही करत आहेत.

आलीकडच्या काळात प्रा. तुकाराम पाटील, पोपटराव पठारे, संगीता फासाटे, मनिषा गायकवाड, यशवंत काळे, सुनील गोसावी, शर्मिला गोसावी, चंद्रकात भोसले, गणेश देशमुख, हेमचंद्र भवर, बाळासाहेब लावरे, अशोक माने, बाळासाहेब आदिक, आप्पा कदम, दीपक तरकासे, पुरुषोत्तम कोळपकर, अमोल बागूल, शशिकांत शिंदे शंकर चव्हाण सुभाष सोनवणे आदिंच्या कवितेतील ग्रामीण जीवन अत्यंत हृदयस्पर्शी आहे.

**समारोप :**

कविता म्हणजे अंतरंगाची उमी असते. भावसंवेदनाची ती शब्दबध्द निर्मिती असते. ज्या कवितेत नाद, लय, ताल असून ती रसयुक्त असते. त्यातून अर्थपूर्णता व्यक्त होते ती कविता होय पांडित्य, स्तुती, स्फूर्ती, लावण्य, सौदर्य, आणि बोधपूर्णतायुक्त शब्दरचना म्हणजे कविता होय. मध्ययुगीन, अर्वाचीन कालखंडात कवितेला विविध धार्मिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, मानसिक संदर्भ मिळत गेले तशी कविता आशयानुरुप बदलत गेली केशवसुतांनी मराठी कवितेला आधुनिकतेची दिशा दिली. मर्ढेकरांनी नवी कविता लिहिली. कुसुमाग्रजांनी कवितेला भारतीय संस्कृतीचा अर्थ सांगितला, दलित ग्रामीण कवितेला त्यातूनच ऊर्मी मिळाली. कवितेचे स्वरुप व वाटचाल यातूनही प्रतिबिंबित होते.

**संदर्भसूची :**

१. नेदरकर, प्रकाश : वाङ:मयप्रकार (काव्य, नाटक), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठ, नाशिक, जून २००२, पृ.०६.
२. डहाके, वसंत आबाजी : कवितेविषयी, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, जुलै १९९९, पृ. ११-१२.
३. नेदरकर, प्रकाश, उनि., पृ.०३.

४. आगरकर, गोपाळ गणेश : संक्षिप्त मराठी वाङ:मय कोश (संपा. दडकर जया व इतर), जी. आर. भटकळ फाउंडेशन, मुंबई, ९ सप्टेंबर,१९९८, पृ. ८३.
५. तत्रैव, पृ.८३.
६. कारगिल, सुषमा (संपा.) : स्वातंत्र्योत्तर मराठी कविता, प्रतिमा प्रकाशन, पुणे, ९ ऑगस्ट, १९९९, पृ. २६६-२६७.
७. तत्रैव, पृ. २८९.